नामको बँक (मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)

Namco Bank (Multi-State Scheduled Bank)

# दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक (मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)

प्रशासकीय कार्यालय : अे-१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबूभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक - ४२२ ००७.

फोन : ०२५३-२३०८२०० ते २०६ Email : ceo@namcobank.in Website : www.namcobank.in


## बँकेच्या स्थावर मिळकतीच्या ( नॉन बँकिंग अॅसेटस् ) विक्रीसाठी लिलाव विक्री नोटीस

खाली नमूद केलेली बँकेच्या स्व:मालकीची आणि ताब्यातील अशी नॉन बँकिंग अॅसेटस् "जसे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे, तेथे जे आहे" ह्या तत्त्वावर खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार जाहीर लिलावानुसार विक्री करायची आहे.

| अनु. क्र. | मिळकतीचे वर्णन | आरक्षित किंमत (लाखात) | अनामत (ई.एम.डी) रक्कम (लाखात) | तपासणीची दिनांक व वेळ | लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुकडी जिल्हा नाशिक पोटतुकडी तालुका दिंडोरीपैकी मौजे जऊळके ग्रामपंचायत हद्दीतील जऊळके येथील स्थावर मिळकत बिनशेती गट नं. १०९ यांसी क्षेत्र ००.८५ हे.आर म्हणजेच ८५०० चौ.मी. रोड वाईडींग क्षेत्र वजा जाता उर्वरीत क्षेत्र ८३०८ चौ.मी. यांसी चतु:सिमा<br>पूर्वेस : गट नं.१०८<br>पश्चिमेस : १२ मी. अंतर्गत रस्ता व गट नं.११० चा भाग<br>दक्षिणेस : १८ मी. मौजे आडगांव शिव रोड<br>उत्तरेस : गट नं. ११२ व १३<br>मिळकत मालकाचे नांव : दि नासिक मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नाशिक | ४७८.०० | ४७.८० | ०८.०७.२०२४ | ०१.०८.२०२४ |

**लिलावाचे ठिकाण :** दि नासिक मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक, **प्रशासकीय कार्यालय :** अे-१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक -४२२००७.

**अटी व शर्ती:**

१. विक्री करीताचे बोली अर्ज आणि अटी व शर्ती आमच्या प्रशासकीय कार्यालय सातपूर, नाशिक येथे कार्यालयीन कामकाजाच्या कोणत्याही दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत प्रत्येक बोलीसाठी रक्कम रु. १,०००/- (ना परतावा) भरुन प्राप्त करता येतील.

२. बोलीदाराने बोली मोहोरबंद पाकीटामध्ये उपरोल्लेखित अनामत रक्कम आरटीजीएस / एनईएफटी द्वारे किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेडयुल्ड बँकेचा नाशिक येथे देय **नासिक मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. च्या नावे पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट दि. ३०.०७.२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत** किंवा त्यापुर्वी उपरोल्लेखित पत्त्यावर **अधिकृत अधिकारी / व्यवस्थापक, लिगल विभाग दि नासिक मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., नाशिक** येथे पोचावयास हव्यात.

३. बोलीदाराने एक पासपोर्ट आकाराचा फोटो आणि निवासाच्या पुराव्यासह जसे पॅन कार्ड/आधार कार्ड सारख्या केवायसी कागदपत्रांची स्वयं साक्षांकित प्रती बोली अर्जा सोबत जमा कराव्यात. लिलावाच्या वेळी सदर मुळ कागदपत्र पडताळणीसाठी आणावी.

४. बोलीचे मोहोरबंद लिफाफे लिलावाच्या वेळी उपरोल्लेखित ठिकाणी उघडण्यात येतील. अनामत रक्कमेशिवाय आणि किंवा राखीव किंमतीपेक्षा कमी असलेल्या बोली स्विकारल्या जाणार नाहीत.

५. बोलीदाराने लिलावाच्या प्रक्रियेमध्ये बोली करीता स्वत: भाग घ्यावयाचा आहे. जर बोलीदाराच्या वतीने बोली प्रक्रियेमध्ये इतर व्यक्तीस भाग घ्यावयाचा असल्यास त्या व्यक्तीने त्याबाबतचे अधिकार पत्र / संचालक मंडळाचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

६. मालमत्तेची विक्री काटेकोरपणे **"जसे आहे जेथे आहे", "जे आहे जसे आहे", "तेथे जे आहे"** करण्यात येईल. काही देणी असल्यास बोलीदाराने त्याचे दायित्व स्विकारायचे आहे. सदर मालमत्तेवर आता एखादी देणी असल्यास त्याबाबत बँकेस काहीही माहिती नाही.

८. बोलीदाराने जी अनामत रक्कम दिली आहे. ती विक्रीच्या किमतीत धरण्यात येईल आणि राहिलेल्या बोलीदारांची अनामत रक्कम बिनव्याजी बोलीदाराला परत करण्यात येईल.

९. यशस्वी बोलीदाराने ठरविलेल्या खरेदी रकमेच्या **२५ टक्के रक्कम** (अगोदर भरलेली अनामत रक्कम समाविष्ट) त्याची बोलणी स्विकारण्यात आल्यानंतर पुढील कामकाजाच्या दिवशी **सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** भरावी आणि उर्वरीत ७५ टक्के बोलीची रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत भरावी.

१०. जर यशस्वी बोलीदार कलम ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बोली रकमेच्या २५ टक्के रक्कम भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री रद्द झाली असे समजले जाईल. तसेच जर बोलीदार उर्वरीत शिल्लक ७५ टक्के रक्कम लिलाव तारखेपासून १५ दिवसाच्या आत भरणा न करु शकल्यास त्याने भरलेली २५ टक्के रक्कम बँक जप्त करेल.

११. विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदाराच्या नावे नोंदणीकृत होण्याकरीता स्टॅम्प ड्युटीसह सर्व कर (१ टक्का टीडीएस) नोंदणीकृत शुल्क आणि प्रासंगिक खर्च यशस्वी बोलीदाराने धारण करणे आवश्यक आहे. 'Deductee' म्हणून बँकेचा पॅन नंबर हा लिलावाची प्रकिया झाल्यानंतर यशस्वी बोलीदारास कळविण्यात येईल. वर नमूद केल्याप्रमाणे टीडीएसचे पैसे दिल्यानंतर यशस्वी बोलीदार हा चलन तसेच फॉर्म नं. 26QB खाते उतान्याची प्रत दाखल करेल.

१२. लिलावाची संपुर्ण रक्कम मिळाल्यानंतर वर नमूद केलेल्या कलम ७ व फॉर्म नं. 26QB बँक ही यशस्वी बोलीदाराच्या लाभात बोलीदाराचे खरेदीखत करुन देईल. की जे संबंधीत सब रजिस्ट्रार ऑफिसमध्ये बोलीदाराच्या खर्चाने व शुल्काने करण्यात येईल.

१३. संपुर्ण बोली रक्कम मुदतीत प्राप्त झाल्यानंतरच सदर मालमत्तेचा ताबा यशस्वी बोलीदारास हस्तांतरीत करतील.

१४. प्राधिकृत अधिकाऱ्यांना कोणतेही कारण न देता आणि पूर्व सुचनेशिवाय लिलाव रद्द करणे / पुढे ढकलणे अथवा कोणतीही बोली स्विकारणे वा नाकारण्याचा आणि विक्रीच्या कोणत्याही अटी आणि शर्तीमध्ये सुधारणा करण्याचा सर्वाधिकार राहील. पुनरावृत्ती, स्पष्टीकरण, शुध्दीपत्र, परिशिष्ट असेल तर www.namcobank.in या बँकेच्या संकेतस्थळावर त्याबाबत माहिती उपलब्ध असेल आणि बोलीदाराने स्वत:च्या माहितीसाठी नियमित संकेतस्थळावर भेट द्यावी.

१५. लिलावाबाबतच्या अधिक माहितीसाठी बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याशी पुढील दुरध्वनी क्रमांक ०२५३-२३०८२०१ मोबाईल क्र. ९८८१३७५२२३ / ९८५०००९६६६ वर संपर्क साधता येईल.

दिनांक : २८/०६/२०२४

ठिकाण : नाशिक

बँकेचा शिक्का

सही/-

**अधिकृत अधिकारी / व्यवस्थापक, लिगल विभाग**